|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**परिपत्रक क्रमांक : २७/२०२४**

**विषय:-** पीएच.डी. च्या तात्पूरत्या प्रवेशित विद्यार्थ्यांना संशोधनाचे शिर्षक व रुपरेषा सादर करण्यासंदर्भात सुचना/कार्यवाही.
**संदर्भ:-** परिपत्रक क्र.24/2024 दि.14/08/2024

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकानुसार पीएच.डी. च्या तात्पूरत्या प्रवेशित विद्यार्थ्यांना संशोधनाचे शिर्षक व रुपरेषा सादर करण्यासंदर्भात सुचना दिलेल्या होत्या त्यात खालील प्रमाणे सुचना दिलेली होती :

ज्या संशोधक मार्गदर्शकांच्या महाविद्यालयात त्यांच्या विषयातील संशोधन केंद्रास अद्याप मान्यता नाही, अश्या मार्गदर्शकांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवेशीत असलेल्या विद्यार्थ्याकरीता, विद्यापीठ अधिकार मंडळाने प्रमाणित करून दिलेल्या सोबत जोडलेल्या यादीतील रकाना क्र.3 (Research Center allotted) मधील संशोधन केंद्रातील मार्गदर्शकांमधून (ग्रंथालय व माहितीशास्त्र {Library & Information Science} व शारीरिक शिक्षणशास्त्र {Physical Education} विषय वगळून) सह-मार्गदर्शक घेण्यात यावा.

**विद्यापीठ अधिकार मंडळाने उपरोक्त प्रमाणे मान्यताप्राप्त संशोधन केंद्राची यादी प्रातिनिधीक स्वरूपात दिलेली आहे.** यासंदर्भात बरेच संशोधक विद्यार्थी व मार्गदर्शक यांच्या पत्रानुसार, त्यांनी यापुर्वी मान्यताप्राप्त संशोधन केंद्राशी संपर्क करून ते व तेथील सहमार्गदर्शक निश्चित केले असल्याचे कळविले आहे तसेच इतर काही प्रशासकीय कारणांस्तव त्यांनी विनंती केलेली आहे, त्यानुसार ज्या संशोधक विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयातील **उपरोक्त प्रमाणे दिलेल्या यादीतील संशोधन केंद्राच्या व्यतिरीक्त विद्यापीठाशी संलग्नीत इतर मान्यता प्राप्त संशोधन केंद्र घ्यावयाचे असल्यास**, त्यास संबंधित विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक यांचे नाहरकत पत्र व त्यांच्या विषयातील ज्या मान्यताप्राप्त संशोधन केंद्रातील मार्गदर्शक सहमार्गदर्शक म्हणून संमती देत असतील, त्या मार्गदर्शकांचे सहमार्गदर्शक म्हणून संमती पत्र, सहमार्गदर्शकांच्या मान्यताप्राप्त संशोधन केंद्राच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या स्वाक्षरीने, सहमार्गदर्शकाबाबतचा परीपुर्ण प्रस्ताव (RRC च्या दिनांकांपूर्वी) विद्यापीठात सादर करणे आवश्यक आहे. **तत्पूर्वी संबंधित विद्यार्थ्यांनी मार्गदर्शकांशी संपर्क साधुन सहमार्गदर्शकांच्या मान्यताप्राप्त संशोधन केंद्रात RAC साठी (ऑनलाईन/ऑफलाईन) हजर राहून, परिपत्रक 24/2024 नुसार कार्यवाही करावयाची आहे. त्यानुसार अश्या विद्यार्थ्यांच्या RAC चे (ऑनलाईन/ऑफलाईन) दि.31/08/2024 पर्यंत आयोजन करावयाचे आहे, जेणेकरून सदर विद्यार्थी दि.31/08/2024 पर्यंत त्यांच्या संशोधनाचे शिर्षक व रूपरेषा upload करू शकतील.**

**(डॉ. डी. एस. जगताप)**
**उपकुलसचिव (अ.का.), संशोधन विभाग**

सोबत :- वरील प्रमाणे.
जा.क्र.कबचौउमवि/11/पीएच.डी./रुपरेषा/1283/2024
दिनांक :24/08/2024

प्रति : 1.सर्व संशोधक विद्यार्थी व मार्गदर्शक, कबचौउमवि, जळगाव
2.सर्व मान्यताप्राप्त पदव्यूत्तर संशोधन केंद्राचे प्रमुख तथा प्राचार्य, कबचौउमवि, जळगाव

☎ : (९१) ०२५७-२२५८४०९ (कार्यालय)
(९१) ०२५७-२२५७२२१, २२२ आणि २२४
फॅक्स : (९१) ०२५७-२२५८४०३ व २२५८४०६
वेबसाईट : www.nmu.ac.in
ई-मेल:pvcresearch@nmu.ac.in